जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -** **दिनांक - २८/०९/२०२४**

लोणीकंद पोलिस स्टेशन पुणे शहर

## लोणीकंद पोलीसांनी जबरी चोरी करणारे दोघांकडुन एक वाहन,०१ देशी बनावटीचे पिस्तुल व ०३ जिवंत काडतुसे केली हस्तगत.

### (लोणीकंद पोलसांनी मागील ३० दिवसात ०८ देशी बनावटीचे पिस्तुल व २६ जिवंत काडतुसे केली जप्त)

लोणीकंद पोलीस स्टेशन,गु.र.नं.८८५/२०२४ भारतीय न्याय संहीता कलम ३०९(४),१२६(२),३५१(२),३(५),३२४(४) अन्वये दाखल गुन्हयातील फिर्यादी हे त्यांचे ताब्यातील मंहिद्रा कंपनीची XUV 300 गाडीने नगरकडुन पुणे कडे येत असताना आरोपीतांनी फिर्यादीची गाडी अडवुन त्यांचा मोबाईल व गाडी जबरीने चोरी करुन घेवुन गेले म्हणुन दिनांक १४/०९/२०२४ रोजी वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्हयात मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.मनोज पाटील, मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ ४ पुणे शहर श्री.हिम्मत जाधव, व मा.सहा.पोलीस आयुक्त,येरवडा विभाग,पुणे शहर श्रीमती प्रांजली सोनवणे, यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक,लोणीकंद पोलीस स्टेशन,पुणे शहर पंडीत रेजितवाड यांना सदरचा गुन्हा उघडकीस आणणे बाबत मार्गदर्शन करुन सुचना दिल्या.

नमुद गुन्हयाचा तपास चालू असताना दिनांक २८/०९/२०२४ रोजी पहाटे **पोलीस नाईक स्वप्निल जाधव** यांना त्यांचे गोपनिय बातमीदारा मार्फत मिळालेल्या माहीती नुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंडीत रेजितवाड, सपोनि रविंद्र गोडसे व पोलीस अंमलदार पोलीस नाईक स्वप्निल जाधव,कैलास साळुंके, अजित फरांदे, पोलीस अमंलदार साईनाथ रोकडे,विशाल गायकवाड यांनी बांगर वस्ती रोड,केसनंद या ठिकाणी सापळा रचुन दोन इसम नामे १) सचिन राजाराम ढोरे,वय ३८ वर्षे,रा.ढोरे वस्ती,मौजे केसनंद ता. हवेली जि.पुणे २) मंथन दत्तात्रय धुमाळ,वय २६ वर्षे, रा.साईनगर,खराडी चंदननगर पुणे यांना शिताफिने ताब्यात घेतले.त्यांचेकडुन गुन्हयात वापरलेली **एक मारुती स्विप्ट कार तसेच अंगझडतीमध्ये ०१ देशी बनावटीचे पिस्तुल व ०३ जिवंत काडतुसे असा एकुण ५,२३,०००/- रुपयेचा मुददेमाल** जप्त करुन नमुद आरोपी यांना दाखल गुन्हयात दिनांक २८/०९/२०२४ रोजी अटक करुन गंभीर स्वरुपाचा गुन्हा उघडकीस आणला आहे. अदयापावेतो झालेल्या तपासात यापुर्वी ०१ आरोपी पोलीस कस्टडीत असुन आज रोजी अटक केलेल्या दोन आरोपीतांना मा.न्यायालयाने दिनांक ३०/०९/२०२४ रोजी पर्यंत ०२ दिवसांची पोलीस कस्टडी रिमांड सुनावली आहे.सदर गुन्हयाचा पुढील तपास सहा.पो.निरि. रविंद्र गोडसे हे करीत आहेत.

**अशा प्रकारे लोणीकंद पोलीसांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंडीत रेजितवाड यांचे नेतृत्वाखाली मागील ३० दिवसात ०८ देशी बनावटीचे पिस्तुल व २६ जिवंत काडतुसे जप्त करुन पुणे शहरातील गुन्हेगारीस आळा घालुन मोठी कामगिरी केली आहे.**

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.मनोज पाटील, मा. पोलीस उपआयुक्त,परिमंडळ ४,पुणे शहर श्री.हिम्मत जाधव, मा.सहा.पोलीस आयुक्त,येरवडा विभाग,पुणे शहर,श्रीमती प्रांजली सोनवणे, मा.सहा.पोलीस आयुक्त,येरवडा विभाग,पुणे शहर (अतिरिक्त कार्यभार) श्रीमती अनुजा देशमाने, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक,लोणीकंद पोलीस ठाणे,पुणे शहर, श्री.पंडीत रेजितवाड, तपास पथकाचे सहा.पो.निरी रविंद्र गोडसे, पोलीस अंमलदार संदीप तिकोणे,कैलास साळुंके,स्वप्निल जाधव,अजित फरांदे,सागर जगताप,शुभम चिनके,साईनाथ रोकडे,पांडुरंग माने,मल्हारी सपुरे,दिपक कोकरे,सुधीर शिवले,विशाल गायकवाड,प्रशांत कापुरे,सागर कडु,शुभम सातव सर्व लोणीकंद पोलीस ठाणे, पुणे शहर यांनी केली आहे.

